सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२५/ 1857
दिनांक 01 JUL 2025

प्रति,
प्राचार्य,
सर्व बी.बी.ए., बी.सी.ए.,अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए.,बी.बी.एम.,बी.एम.एस.,बी.सी.ए.,एमबीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांचे शुल्काबाबत...**

**संदर्भ :** १.मा.संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२५-२६/२९१ दिनांक २२/०५/२०२५

२. कुलसचिव,संत गाडगेबाबा विद्यापीठ,अमरावती यांचे पत्र क्र.संगाबाअवि/८/सी-१३५७/२०२५ दिनांक २९/०६/२०२५

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए.,बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एमबीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्था AICTE अंतर्गत आलेले आहेत. सदर अभ्यासक्रमांकरिता शै.वर्ष २०२४-२५ हे संक्रमण कालावधी वर्ष आहे. त्यामुळे शै.वर्ष २०२४-२५ साठीचे सदर अभ्यासक्रमाचे शुल्क संबंधित विद्यापीठाने निश्चित करुन त्याबाबतची माहिती सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांना उपलब्ध करुन देण्याबाबत संदर्भ क्र.१ चे पत्रानुसार निर्देश देण्यात आलेले होते.

त्यानुसार, कुलसचिव, संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती यांची बी.बी.ए., बी.सी.ए., या अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चितीबाबतची संदर्भ क्र.२ ची अधिसुचना या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. सदर अधिसुचना आपल्या पुढील आवश्यक कार्यवाहीकरीता सोबत जोडण्यात येत आहे.

**सदर अधिसुचनेचे अवलोकन करुन संस्थांनी खालीलप्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी.**

१. संस्थांनी, डीबीटी लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन संस्थेची माहिती (Institute Profile) सर्व माहिती जसे शैक्षणिक शुल्क, अभ्यासक्रमाचा तपशील इत्यादी (For example: Fee details, Course Details etc.) अचूक भरुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावी. (संस्थेकडून भरण्यात आलेल्या माहितीची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख यांची राहील याची नोंद घ्यावी)

२. संस्थांनी सदर माहिती विभागीय कार्यालयाकडून मंजूर करुन घ्यावी, जेणेकरुन डीबीटी पोर्टलवर संस्थांना त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविता येतील. ( तसेच शैक्षणिक शुल्क मंजूरी प्रलंबित (Fees Not Approved) या कारणास्तव जर संस्थांना विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविता आले नाही तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख यांची राहील याची नोंद घ्यावी.)

३. डीबीटी पोर्टलवर संस्थेकडून भरण्यात आलेले व मंजूरीसाठी पाठविण्यात आलेले शुल्क डीबीटी पोर्टलवर एकदा मंजूर करण्यात आलेल्या शुल्कामध्ये दुरुस्ती करता येणार नाही व मंजूर झालेल्या शुल्कानुसार त्या त्या संबंधित योजनांचा लागू असलेला लाभ देण्यात येतो या कारणास्तव डीबीटी पोर्टलवर संस्थांनी घटकनिहाय शुल्क अचूक भरुन मंजूरीसाठी पाठवावे.

४. संस्थांची माहिती (Institute Profile) अद्ययावत करतांना आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी (जसे संबंधित शासननिर्णय, शिक्षण शुल्क/विकास शुल्काबाबत विद्यापीठाची शुल्क मंजुरीची प्राचार्यांनी प्रमाणित केलेली कागदपत्रे. परिक्षा शुल्काचे (Exam Fee), विद्यापीठाचे मंजुरीबाबतची कागदपत्रे व सदर शुल्क प्रमाणित केलेले प्राचार्यांचे प्रमाणपत्र (संस्थेकडून सदर कागदपत्रे व परिक्षा शुल्काचे प्राचार्यांचे शुल्क प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडलेले (Upload) नसेल तर डीबीटी पोर्टलवर शुल्काला मंजूरी देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी)

**सहपत्र** : वरीलप्रमाणे

**(मनोज म.अंधारे)**
**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत:**

**१.मा.संचालक,** तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
**२.प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी तसेच डीबाटी वर्क फ्लोनुसार संस्थांच्या डीबीटी पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर उचित कार्यवाही करण्यात यावी.

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

(असाधारण)

रविवार, दिनांक २९/०६/२०२५

अधिसुचना

क्रमांक :- ८६/२०२५ दिनांक :- २९/०६/२०२५

विषय :- अधिसुचना क्र. ७७/२०२४ दि. १२.०७.२०२४ नुसार विद्यार्थ्याकडून आकारण्यात येणारे शुल्क संबंधित निर्गमित करण्यात आलेल्या अधिसुचनेमध्ये दुरुस्ती करण्याबाबत...

संदर्भ :- १) अधिसुचना क्र. ७७/२०२४ दि. १२.०७.२०२४

२) शासनाचे पत्र क्र. बैठक – २०२५/ प्र. क्र.स ४१/तांशि – ४, दि. २० मे, २०२५

ज्याअर्थी, उपरोक्त अधिसुचनेनुसार सत्र २०२४-२०२५ पासुन विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत अधिसुचित करण्यात आले आहे.

आणि

ज्याअर्थी, उपरोक्त अधिसुचनेतील Appendix-B (unaided courses) या अंतर्गत नमुद बी.बी.ए व बी.सी.ए या अभ्यासक्रनाचा AICTE अंतर्गत समावेश आहे.

आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने पत्र क्र. बैठक – २०२५/ प्र. क्र.स ४१/तांशि – ४, दि. २० मे, २०२५ च्या पत्रान्वये बी.बी.ए., बी.सी.ए. अभ्यासक्रमांचा AICTE अंतर्गत समावेश झाल्यामुळे विद्यापीठाला शुल्क निश्चित करुन सादर करावयाचे निर्देश दिले आहेत.

आणि

ज्याअर्थी, विद्यापीठाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम १०१ (७) अंतर्गत कार्यवाही करुन मा. अधिष्ठाता मंडळामार्फत शुल्क निश्चिती समितीमार्फत, शुल्क व इतर शुल्क ठरविण्यात आले आहे व विद्या परिषदेला शिफारस केली आहे. शासनाला तातडीने कळवायचे असल्यामुळे विद्या परिषदेच्या वतीने कलम ३३ (१) (e) अंतर्गत सदर शुल्कास मान्यता देण्यात आली आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना अधिसुचित करण्यात येते की, उपरोक्त अधिसुचनेमध्ये असलेले Appendix-B मध्ये (unaided courses) वी.वी.ए., बी.सी.ए. या अभ्यासक्रचे रकाना क्र. ४ मध्ये (fee for courses) नुसार असलेले शुल्क अनु. क्र. १, ३, ५, १० मध्ये असलेले शुल्कामध्ये खालीलप्रमाणे बदल करुन तसे शुल्क सत्र २०२५-२०२६ करीता आकारण्यात येईल.

| अनु.क्र. | Item/Head | Present Fee | ऐवजी | B.C.A. | B.B.A. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Tution Fee | Rs. 6000/- | ऐवजी | Rs. 27,500/- | Rs. 23,500/- |
| 3. | Laboratory Fee | Rs. 5280/- (BCA)<br>Rs. 1760/- (BBA) | ऐवजी | Rs. 6100/- | Rs. 4100/- |
| 5. | Library Fee | Rs. 1760/- | ऐवजी | Rs. 2025/- | Rs.2025/-(15% increase) |
| 10. | Excursion/Industrial Tour/Field visit. | Rs. 110/- | ऐवजी | Rs. 1500/- | Rs. 1500/- |

उपरोक्त शुल्क शासनाला संक्रमण कालावधीकरीता व जोपर्यंत शासन स्तरावर (FRAकडून) सदर शुल्क निश्चिती होत नाही तोपर्यंत उपरोक्त शुल्क हे शासन मान्यतेच्या अधिन राहुन आकारण्यात येईल.

स्वा/-

(डॉ.अविनाश असनारे)

कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ